अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. २२ फेब्रुवारी २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १४४ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## 'रेडिओ किंग' अमीन सयानी यांचे निधन



**मुंबई** : रेडिओचा आवाज, रेडिओ किंग अशा अनेक उपाधींनी गौरवण्यात आलेले ज्येष्ठ सूत्रसंचालक, उद्घोषक अमीन सयानी यांचे निधन झाले. ते ९१ वर्षांचे होते. अमीन सयानी यांचा मुलगा राजिल सयानी यांनी अमीन सयानी यांनी माहिती दिली.

अमीन सयानी यांनी बुधवारी सकाळी सहा वाजता हृद्यविकाराचा झटका आला. यानंतर त्यांना तातडीने एच.आर. रिलायन्स फाऊंडेशनच्या रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान अमीन सयानी यांची प्राणज्योत मालवली. अमीन सयानी यांच्या जाण्याने रेडिओच्या सुवर्णयुगाचा शिल्पकार हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या खास आवाजातील 'बहनों और भाईयो आप सुन रहे है...' ही वाक्य आजही सिने रसिक, रेडिओ प्रेमींच्या मनात घर करुन आहेत. अमीन सयानी यांच्यावर २२ फेब्रुवारी रोजी अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती निकटवर्तीयांनी दिली. रेडिओ सिलोन आणि विविध भारती चॅनलवरील 'बिनाका गीतमाला' या त्यांच्या कार्यक्रमाने तेव्हाचे लोकप्रियतेचे सर्व मापदंड मोडीत काढल होते. प्रत्येक आठवड्याला रेडिओप्रेमी त्यांचा आवाज ऐकण्यासाठी आसुसले असायचे. अमीन सयानी यांनी जवळपा १९ हजार जिंगल्सना आवाज दिला होता. त्यांच्या या विक्रमाची नोंद 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये झाली होती.

# लोकसभेच्या उमेदवारीसाठी मोहिते-पाटलांकडून भाजपच्या गडाला दबाव तंत्राच्या ढुसण्या

- रणजितसिंह मोहिते-पाटलांच्या 'लाल' दिव्यासाठी 'बी' प्लॅनची रणनीती
- बाळदादांच्या बॉम्बच्या ठिकऱ्या; माढ्यासह प्रदेश भाजप श्रेष्ठींच्या दरबारी

### माढ्याची खासदारकी किंवा लाल दिव्याच्या गाडीसाठी अकलूजकर सिंहांची वज्रमूठ

सुराज्य/शिवाजी भोसले

**बहुचर्चित माढा लोकसभेच्या भाजपाच्या उमेदवारीवरून फलटणकर नाईक-निंबाळकर आणि अकलूजकर मोहिते-पाटील यांच्यामधील संघर्ष आता टोकाला जात आहे. तथापि, याच टप्प्यावर मोहिते-पाटील गटाने 'अभी नही तो कभी नही' चा नारा देत लोकसभेच्या उमेदवारीसाठी भाजपच्या गडाला दबाव तंत्राच्या ढुसण्या देणे सुरू ठेवले आहे. मात्र, 'सही दिशा अन् स्पष्ट नीती ' तसेच शिस्त मानणाऱ्या भाजपवर या दबाव तंत्राचा किती परिणाम होतो, हे लवकरच कळणार आहे. अकलूजच्या सिंहांची ताकद मान्य करत माढ्याच्या लोकसभेची उमेदवारी मोहिते-पाटील यांच्या परिवारात भाजपा देणार की त्यांचे दबाव तंत्र झुगारून उलट फलटणकरांच्या सिहांचा अश्वमेध दुसऱ्यांदा माढ्याच्या मुलूखात फिरविण्याला उमेदवारीसह सर्वच आघाड्यांवर 'रसद' पुरविणार हे पाहण्याची वेळ आली आहे.**






दरम्यान, धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या लोकसभा उमेदवारीला भाजप श्रेष्ठींकडून विरोध होऊ लागल्यास त्या टप्प्यावर आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांना मंत्रिपद देण्याचा शब्द घेऊन त्यांचे राजकारणातील स्थिरीकरण करायचे, असा मोहिते-पाटील परिवाराचा 'बी' प्लॅन तयार असल्याचे राजकीय विश्लेषकांना वाटते. जयसिंह मोहिते-पाटील ऊर्फ बाळदादा यांनी श्री शंकर साखर कारखाना निवडणुकीच्या प्रचार सभेत लोकसभेच्या उमेदवारीच्या पार्श्वभूमीवर, भाजपवर जणू दबाव येईल, असाच बॉम्ब फोडला. ' आमच्या उमेदवाराला लोकसभेचे तिकीट मिळणार आहे. त्यांनी निवडणूक लढण्यातून माघार घेण्याचा निर्णय घेतल्यास मी लोकसभेची निवडणूक लढवीन...श्री. शंकर साखर कारखान्याची निवडणूक म्हणजे आपली लोकसभेची रंगीत तालीम आहे' असाच तो फोडलेला शाब्दिक बॉम्ब! ज्या बॉम्बच्या माढा लोकसभा मतदार संघात ठिकऱ्या उडाल्या. शिवाय तथापि, बॉम्बचे पडसाद उमटले ते प्रदेश भाजपच्या वरिष्ठांमध्ये

अकलूजकर मोहिते-पाटील परिवाराच्या दबाव तंत्राच्या राजकारणाची भाजपासह अन्य विरोधी पक्षाच्या पटलावर आता चर्चा सुरू झाली आहे. भाजपकडून उमेदवारी न मिळाल्यास, शरद पवार राष्ट्रवादी गटाकडून ते माढ्याची जागा लढतील का? हा मुद्दा केंद्रस्थानी ठेवूनदेखील चर्चेच्या फेऱ्या झडू लागल्या आहेत.


### लोकसभेच्या 'त्या' लीडचे होऊ शकते पोस्टमार्टम...

या टर्मच्या माढा लोकसभेच्या उमेदवारीचे आम्हीच खरे दावेदार आहोत, सन २०१९ च्या लोकसभेला माळशिरसमधून लाखांहून अधिक लीड दिला होता. त्यामध्ये आमच्या नेतृत्वाची सारी किमया होती, असा दावा मोहिते-पाटील गटाकडून केला तर त्यावेळी या दाव्यावर प्रतिदावा केला जाऊ शकतो. विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना मिळवून दिलेल्या लाखाहून अधिकच्या लीडमध्ये उत्तम जानकर यांच्या लीडचा ही समावेश आहे. राम सातपुते यांच्या आमदारकीवेळी हा लीड कोठे गेला? अवघ्या अडीच हजार मतांचाच लीड कसा? हा मुद्दा ही उपस्थित केला जाऊ शकतो.

### बाळदादांची शरद पवार यांच्याशी भेट अन् 'ते' वक्तव्य

अलीकडच्या काही दिवसांत बाळदादा आणि त्यांच्या कन्या स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांनी बारामती येथे जाऊन ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेऊन चर्चा केली होती असा बोलबाला आहे. तद्नंतर स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांनी खासदार सुप्रिया सुळे यांना अकलूजमधील एका कार्यक्रमाला आमंत्रित केले होते. सौ.. सुळे या काही कारणास्तव आल्या नाहीत हा भाग वेगळा. पण बाळदादा जेव्हा लोकसभेसाठी मोहिते-पाटील यांची उमेदवारी राहणारच अशी भीष्म प्रतिज्ञा करत आहेत, हा संदर्भ लक्षात घेता, मोहिते-पाटील परिवाराला भाजपाने उमेदवारी डावल्यास शरद पवार गटाच्या उमदेवारीचा मोहिते-पाटील यांच्याकडे पर्याय आहे, असाही ठोसपणे अंदाज लावला जात आहे.

### साडेपाच हजार मतांवर लोकसभेचे गणित कसे?




मोहिते-पाटील परिवाराकडून लढविल्या जाणाऱ्या निवडणुकांचे 'किंगमेकर' तथा रणनितीकार बाळदादा यांनी श्री. शंकर साखर कारखान्याची निवडणूक म्हणजे लोकसभेची रंगीत तालीम असल्याचे समजून काम करा, असे प्रचार सभेदरम्यान सांगितले. वास्तविक या कारखान्याचे सभासद हे साधारण ५ हजार ५०० आहेत. जे माळशिरस, माण, खटाव, इंदापूर या तालुक्यातील काही गावचे आहेत. जे मुळीच मोहिते-पाटील यांचे निष्ठावंत आहेत. केवळ साडेपाच हजार सभासदांच्या जिवावर बाळदादांनी लोकसभेचे गणित घातलेच कसे? हा मुद्दा चर्चेत आला आहे.

### मोहिते-पाटील यांना शरद पवार राष्ट्रवादी गटात जाण्याला अशा आहेत अडचणी

- सदाशिवनगरच्या शंकर साखर कारखाना चालू करण्यासाठी झालेली आर्थिक मदत
- रणजितसिंह मोहिते-पाटील यांना आमदारकी बहाल करुन त्यांचे बसविलेले बस्तान
- मुख्यत्वे, सुमित्रा पंतसंस्थेसह अन्य वित्तीय संस्थांमधील अडचणी
- पश्चिम महाराष्ट्रातील एके काळचा सर्वात मोठा शिवामृत दूध संघ डबघाईला
- राजहंस, विजय, विजयरत्न, अशा संस्थांना लागलेले टाळे !

## निराधार योजनेतील महिलेच्या खात्यातून काढले ४० हजार

- सोलापुरातील दोघांना दोन दिवसाची कोठडी
- पंढरपूर बँकेतील फसवणुकीचा प्रकार



**सोलापूर** : शासनाच्या महिला निराधार योजनेतील बँकेत जमा झालेली ४० हजाराची रक्कम तोतया महिलेस उभी करून काढून घेतल्याची घटना पंढरपूर येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेस नुकतीच उघडकीस आली. या प्रकरणात पंढरपूर शहरच्या पोलिसांनी सोलापुरातील एका महिलेसह तिघा विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली. त्यांना २ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश पंढरपूरच्या न्यायालयाने बुधवारी दिला आहे.

सचिन सर्जेराव शिंदे (वय २५ रा. रामवाडी, सोलापूर), नुरुद्दीन साहेबलाल वळसंगकर (वय ४० रा.कुंभारी ता.दक्षिण सोलापूर) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. या दोघांनी मिळून १६ ते २० फेब्रुवारी या दरम्यान जन्नतबी उस्मान शेख (रा.संतपेठ पंढरपूर) या निराधार महिलेच्या बँक खात्यावर जमा असलेली रक्कम हडप करण्याचा बेत रचला. आणि जन्नतबी शेख या लाभार्थीच्या नावावर शांताबाई परमेश्वर जमदाडे (वय ६० रा.रामवाडी,सोलापूर) या तोतया महिलेस बँकेत नेले. आणि जन्नतबी असल्याचे सांगून त्यांच्या खात्यावरील ४० हजार रुपये काढून घेतले. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर बँकेचे कर्मचारी राकेशकुमार विश्वास यांनी पंढरपूर शहर पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली. पुढील तपास महिला फौजदार खडके करीत आहेत.

## तेरामैलजवळ अपघात; दुचाकीवरील तरुण ठार

### पत्नी आणि मुलगा गंभीर जखमी

सुराज्य/सोलापूर

नातेवाईकाचे कार्यक्रम आटोपून दुचाकीवरून गावाकडे जात असताना पाठीमागून मोटार धडकल्याने दुचाकीवरून ३० वर्षीय विवाहित तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावले. तर त्यांची पत्नी आणि मुलगा हे दोघे गंभीर जखमी झाले. हा अपघात सोलापूर ते विजापूर रोडवरील तेरामैल जवळ मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडला.



निजाम हुसेन शेख (वय ३० रा.मंद्रूप ता. दक्षिण सोलापूर) असे मयताचे नाव आहे. ते काल रात्री ११ वाजेच्या सुमारास विजापूर रोडवरील नातेवाईकाचे कार्यक्रम आटपून आपल्या दुचाकीवरून पत्नी गुलजार (वय २०) आणि मुलगा बंदेनवाज शेख (वय २ वर्षे रा.मंद्रूप) यांच्यासोबत मंद्रूप येथे घराकडे निघाले होते.

रात्री ११ वाजेच्या सुमारास १३ मैल क्रॉस रोडवरील होनमुर्गी पाटीजवळ पाठीमागून एमएच०८-झेड-२५७२ या क्रमांकाची मोटर धडकल्याने तिघेही गंभीर जखमी झाले होते. त्यांना खाजगी रुग्णालयात उपचार करून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्यापैकी निजाम शेख हे आज बुधवारी दुपारी मयत झाले. मयत निजाम शेख हे मजुरी करीत होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी आणि एक मुलगा असा परिवार आहे. अपघाताची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# शहरात सव्वा कोटींचा ५६४ किलो ग्रॅम गांजा अन् वाहने जप्त

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




मग आम्ही काय वेगळं करतो?

कल्याण
159-52-129

मुंबई
267-54-400

- ओरिसा, आंध्रप्रदेश येथून महाराष्ट्रात गांजाची तस्करी करणाऱ्या दोन कारवाया
- ६ आरोपींना स्थानिक गुन्हेशाखेकडून अटक; तिघे आरोपी फरार

सुराज्य/सोलापूर

ओरिसा, आंध्रप्रदेश या राज्यातून गांजा या अंमली पदार्थांची चोरटी वाहतूक सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वरून होत असल्याबाबतची गोपनिय माहिती खबऱ्या कडून स्थानिक गुन्हेशाखेच्या पथकाला मिळाली होती. त्यामुळे स्थानिक गुन्हेशाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर व त्यांच्या पथकाने सोलापूर-मोहोळ रस्त्यावरील कोंडी गावच्या हद्दीत असलेल्या एका हॉटेल जवळील पुलावर सापळा लावला आणि चारचाकी मालवाहतुक गाडी पकडली. यावेळी पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली तर एक आरोपी पळून गेला.




तसेच दुसरी कारवाई मोडनिंब ते जाधववाडी रोडवर सापळा रचून करण्यात आली. यामध्ये दोन कारमधून गांजा जप्त करून चार आरोपींना अटक करण्यात आली तर दोन आरोपी पळून गेले. अशा प्रकारे स्थानिक गुन्हेशाखेच्या पोलिसांनी ६ आरोपींना अटक केली. तर ३ आरोपी फरार आहेत. यामध्ये पोलिसांनी १ कोटी ३६ लाख ८३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला, अशी माहिती पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली. ओरिसा व आंध्रप्रदेश या राज्यातून गांजा या अंमली पदार्थाची वाहतूक राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वरून होत आहे. सदर वाहनांची माहिती काढून कारवाई करावी, असे आदेश सरदेशपांडे यांनी स्थानिक गुन्हेशाखेला दिले होते. त्या आदेशानुसार स्थानिक गुन्हेशाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांनी आपल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या. त्याप्रमाणे हवालदार विजयकुमार भरले यांना माहिती मिळालही की, दि. १९ फेब्रुवारी रोजी सोलापूर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतून एका चारचाकी वाहनातून दोन व्यक्ती या गांजाची वाहतूक करीत आहेत. हा गांजा आंध्रप्रदेश येथून बारामतीकडे जाणार आहे. त्या मिळालेल्या बातमीनुसार स्थानिक गुन्हेशाखेच्या पोलिसांनी कोंडी गावच्या हद्दीत असलेल्या एका हॉटेल जवळील पुलावर सापळा लावला. त्या वाहनाचा पाठलाग करून एमएच ४२/बीएफ १९२६ या क्रमांकाची चारचाकी गाडी पकडली. आरोपी अल्ताफ युन्नूस इनामदार (वय ३८ रा. पिंपळी) या चालकाला व जमीर इब्राहिम शेख (वय ३६ रा. सिद्धेश्वर गल्ली, बारामती) या दोघांना अटक केली. यावेळी तिसरा आरोपी लाला बागवान (रा. बारामती) हा फरारी आहे. याची नोंद तालुका पोलीस ठाण्यात झाली आहे. पोलिसांनी आरोपींना कोर्टापुढे उभे केले असता न्यायाधीशांनी आरोपींना २६ फेब्रुवारी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली. तसेच २४ जानेवारी स्थानिक गुन्हेशाखेचे (पान ३ वर)